# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजे करंबळी (जि.कोल्हापूर) पाटगाव धरणावरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे वजा पूलाच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(१) १०१३७ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे करंबळी (जि.कोल्हापूर) पाटगाव धरणावरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे वजा पूल पडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करण्यासाठी शासन निर्णय घेतला काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०८-२०१५) :** (१) होय.

(२) सदर कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्ती कामास दिनांक २०/८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या कामासाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत निधीची तरतूद करुन कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील भिलेदोरी नाल्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(२) १२५३४ (०८-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील भिलेदोरी नाल्यासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावेत या मागणीसह तिवसा मतदार संघातील विविध विकासाचे प्रश्न असलेले निवेदन दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातल्या मागण्या काय आहेत व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे. मौजा शिंदवाडी, ता.तिवसा, जिल्हा अमरावती येथील गावकऱ्यांचे मा.मुख्यमंत्री यांना सादर केलेल निवेदन दिनांक १७/१/२०१५ रोजी प्राप्त झाले होते.

तसेच याबाबत लोकप्रतिनिधींचे दिनांक १७.११.२०१४ व २७.११.२०१४ चे निवेदन अधिक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर मंडळास प्राप्त झाले आहे
(२) सदर निवेदनात निम्न वर्धा प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील अंजनसिंगी व कौंडण्यपूर या गावांना जोडणाऱ्या भिलदोरी नाल्यावरील पुल बांधून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ठेव तत्वावर करण्यात येणार असून, कामास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी रु. ६००.०० लक्ष इतक्या रकमेकरीता दिनांक २२.७.२०१५ रोजी तांत्रिक अनुमती प्रदान केली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील रेणा नदीवरील लातूर पध्दतीचे बॅरेजेसची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३) १३२६९ (०८-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील रेणा नदीवरील घनसरगाव, को.प.बंधारा, खरोळा को.प.बंधारा व रेणापूर को.प.बंधारा या लातूर पध्दतीचे बॅरेजेसची कामे गत वर्षापासून निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामांना निधी वितरीत करुन कामे पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.वित्त व नियोजन मंत्री, मा.जलसंपदा मंत्री व कार्यकारी संचालक यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर कामे पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-१०-२०१५) :** (१) लातूर जिल्ह्यातील रेणा नदीवरील लातूर पध्दतीच्या बॅरेजेसची कामे अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांच्या निदेशानुसार उपलबध होणा-या निधीतून कामे पूर्ण करण्या येत आहेत.

(२) होय, हे खरे आहे,
(३) रेणा नदीवरील घनसरगांव को.प. बंधारा नुतनीकरणाचे काम ८० टक्के पूर्ण झालेले असून, रेणापूर को.प. बंधा-याच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच खरोळा को.प. बंधाऱ्याच्या नुतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या योजनेची उर्वरीत कामे अवशिष्ट निधीतून निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) निधी उपलब्धतेनुसार कामे सत्वर पूर्ण करण्यात येतील.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाअंतर्गत अंतर जिल्हा बदलीसाठी एक हजार शिक्षक प्रतिक्षा यादीत असल्याबाबत**

**(४) १६४९० (१७-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाअंतर्गत अंतर जिल्हा बदलीसाठी एक हजार शिक्षक प्रतिक्षा यादीत असून या कामासाठी नेमलेली समिती अद्याप अहवाल पूर्ण न करु शकल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने ही बदली प्रक्रिया लवकरात लवकर करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-१२-२०१५) :** (१), (२) ,(३) व (४) धुळे जिल्हा परिषदेच्या आंतर जिल्हा बदलीसाठी नियुक्त केलेल्या समितीने, संबंधीत शिक्षकाकडून वेळोवेळी सूचना व हरकती मागवून, अंतिम यादी दि. २४/४/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तर पती-पत्नी एकत्रिकरणक प्रस्तावाअंतर्गत सबळ पुराव्या निशी दि. ३० एप्रिल, २०१५ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची आंतर जिल्हा बदलींची यादी तयार करण्यात आली होती. तथापि दि. १८/५/२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाने अंतरीम स्थगिती दिलेली असल्याने बदल्या होऊ शकल्या नाहीत. दि. १२/८/२०१५ रोजी मा.न्यायालयाने स्थगिती उठविली असल्याने बदली प्रक्रिया पूर्ववत सुरु झाली आहे.

---

**पुरमेपाडा लघुप्रकल्पाचे (जि.धुळे) लाभक्षेत्र विस्तारीकरणाबाबत**

**(५) १६४९३ (१७-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील पुरमेपाडा लघुप्रकल्पाचा लाभ पुरमेपाडा,अनकवाडी, आर्वी, मोघण, हेंद्रुण, धारडा, धाडरी, बोरकुंड,शिरुड, बोळे, बाबरे आदी गावांना हव्या त्या प्रमाणात होत नसून मालेगांव तालुक्यातून वाहणाऱ्या मौसम नदीचे वाहून जाणारे पाणी पुरमेपाडा प्रकल्पात टाकल्यास आर्वी परिमंडळातील शेतजमिन १०० टक्के ओलीताखाली येईल असे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर क्षेत्र ओलीताखाली आणण्यासाठी शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेण्याचे ठरविले आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंतर जिल्हा बदलीने येणाऱ्या प्राथमिक शिक्षकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत**

**(६) १६६९१ (१४-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतर जिल्हा बदलीने येणाऱ्या प्राथमिक शिक्षकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत या मागणीसाठी शिक्षकांनी सोलापूर जिल्हा परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन केले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-१२-२०१५) :** (१) होय.

(२) जिल्हा परिषदे अंतर्गत पटनिश्चितीची कार्यवाही चालू असून पूर्ण होताच समायोजन करुन प्रवर्ग निहास रिक्त पदावर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात येत

आहे. आपसी आंतर जिल्हा बदलीने सोलापूर जिल्हा परिषदेअंतर्गत सामावून घेण्याबाबत कार्यवाही चालू आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे शिक्षकांची पदे रिक्त नसल्याने व शासन पत्र क्रमांक जिपब ४८१५/प्रक्र.१२२/१५/आस्था-१४ दिनांक १८.०५.२०१५ अन्वये आरटीई ॲक्ट मधील तरतुदीनुसार शिक्षकांच्या पदनिश्चितीबाबात कार्यवाही पूर्ण होत नाही व मा.न्यायाधिकरनाच्या जैसे थे परिस्थितीबाबत निर्णय होत नाही तोपर्यत आपसी बदली व्यतिरिक्त कोणत्याही प्रशासकीय/विनंती बदल्या करण्यास स्थगिती दिली होती. सदर स्थगिती शासन पत्र क्रमांक - जिपब ४८१५प्रक्र.१२२/१५/ आस्था-१४ दिनांक २८.०९.२०१५ रोजी उठविण्यात आलेली आहे. अशा प्रकारे शिक्षकांची पदे नसल्याने व बदलीस शासनाची स्थगिती असल्याने विलंब झाला आहे.

---

**चळे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील जिल्हापरिषद शाळेतील शिक्षकाने वरीष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी न घेता प्रतिशिक्षक नेमल्याबाबत**

**(७) १६६९३ (०६-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चळे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील जिल्हापरिषद शाळेतील शिक्षकाने वरीष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी न घेता व प्रतिशिक्षक नेमण्याची तरतूद नसतानाही तेथील शाळेत शिक्षकाची नेमणूक केल्याचे माहे एप्रिल २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने संबंधीत शिक्षकाविरोधात शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-१२-२०१५) :** (१) नाही.शाळेतील शिक्षका प्रसुती रजेवर गेल्याने शाळा व्यवस्थापन समितीने विनामानधन स्वयंसेवक नेमणुकीस परवानगी दिल्याने तशी नेमणुक केली होती.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नायगांव बाजार (जि.नांदेड) येथील पंचायत समिती गोरगरीब नागरीकांसाठी तहसिल अंतर्गत विविध योजना राबविण्याबाबत**

**(८) १६९३५ (१७-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.काशिराम पावरा (शिरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव बाजार (जि.नांदेड) येथील पंचायत समिती गोरगरीब नागरीकांसाठी तहसिल अंतर्गत शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात पण या कार्यालयातील संबंधित अधिकारी, कर्मचारी हे जिल्हयाच्या ठिकाणाहून ये-जा करीत असल्यामुळे वरिष्ठाची धाक न राहिल्यामुळे गोरगरीब नागरीकांना शासनाच्या योजनाच्या कामासाठी वारंवार ये जा करावी लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव गोरगरीब जनतेची गैरसोय होत असल्यामुळे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-१२-२०१५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नायगांव यंनी पंचायत समिती अंतर्गत कर्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी हे मुख्यालयी वास्तव्य करुन राहतात का याबाबत खात्री केली असता काही अधिकारी/कर्मचारी हे मुख्यालयी वास्तव्य करुन राहत नाहीत असे निदर्शनास आले. अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याबाबत नोटीस काढून सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच गोरगरीब जनतेला शासनाच्या योजनांच्या कामासाठी वारंवार ये-जा करावी लागणार नाही याबाबतची दक्षता घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

---

### अमरावती जिल्हयातील धडक सिंचन विहिरीचे मुल्यांकन करण्याबाबत

**(९) १६९६२ (१४-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील धडक सिंचन विहिरीचे मूल्यांकन न करता जिल्हा परिषदेचे कनिष्ठ अभियंता प्रति मावळे हे रजेवर गेले असल्याने महाराष्ट्र ग्रामविकास रोजगार हमी योजनाच्या मजुरांना मजुरीपासून वंचित रहावे लागले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातकुली तालुक्यातील मरेगा अंतर्गत सिंचन विहिरीची ४६ कामे उपविभागात देण्यात आले या संदर्भात मूल्यांकनासह हजेरीपट कार्यालयात सादर करणे गरजेचे होते ज्यामुळे कामाचा मोबदला मजुरांना तहसील कार्यालयामार्फत देण्यात आला असता परंतु या कामाकडे श्री.मावळे यांनी दुर्लक्ष केले व दीर्घ रजेवर परस्पर निघून गेले त्यामुळे कामाच्या मुल्यांकना अभावी मजुरांनी काम बंद केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) कनिष्ठ अभियंता श्री. मावळे यांच्या विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना सादर करण्यात आला आहे. पुढील शिस्तभंगविषयक कार्यवाही कार्यवाही अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील पंचायत समितीच्या माध्यमातून नेरपिंगळाई येथे रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१०) १७००९ (१७-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील पंचायत समितीच्या माध्यमातून नेरपिंगळाई येथे रोजगार हमी योजनेवर मृत व्यक्ती काम करत असल्याचे दाखविण्यात आले असून त्यामुळे या योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-१०-२०१५) :** (१) या प्रकरणी गैरव्यवहार झालेला नाही, परंतु अनियमितता झाली.
(२) होय,
सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अंती मृत व्यक्तीचे नाव ई-मस्टर वर आढळून आले. सदर व्यक्तीच्या नावे असलेली मजूरीची रक्कम रु.१२६८/- ही त्यांच्या पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे.
(३) ग्राम पंचायत, नेरपिंगळाई. ता. मोर्शी येथील काम रोजगार सेवक यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे. तसेच तत्कालीन ग्रामसेवक ग्राम पंचायत, नेरपिंगळाई यांची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.
(४) निरंक.

---

**पालघर जिल्हयातील ४० हजार कर्मचाऱ्यांचे ठाणे जिल्हयात समायोजन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(११) १७०३७ (१७-०९-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन ८ महिने झाले तरी पालघर जिल्हयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ठाणे जिल्हयात समायोजन करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर ग्रामविकास विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयाचे विभाजन झाल्यानंतर नव्याने अस्तित्वात आलेल्या पालघर जिल्हयात कार्यरत असलेले, तसेच ठाणे जिल्हयात वास्तव्य करणाऱ्या ४ हजार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा निर्णय न झाल्यामुळे या कर्मचाऱ्यांना सध्या पालघर जिल्हयातच काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन पालघर जिल्हयाची निर्मीती करण्यात आली असून या दोन्ही जिल्हयातील जिल्हास्तरावरील गट-क व गट-ड पद भरती करण्याच्या अनुषंगाने, दोन्ही जिल्हयांची नवीनतम लोकसंख्या (अनुसुचित जाती व जमाती) विचारात घेऊन आरक्षण निश्चितीची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाद्वारे प्रगतीपथावर आहे. या दोन्ही जिल्हयांचे आरक्षण निश्चित झाल्यानंतर जुन्या एकत्रित ठाणे जिल्हयातील कर्मचाऱ्यांच्या विकल्पानुसार विभाजीत ठाणे जिल्हयात उपलब्धतेनुसार टप्प्याने समायोजन करण्यात येईल व अशी प्रक्रीया करतांना नवनिर्मीत पालघर जिल्हयासाठी पदे रिक्त राहणार नाहीत या दृष्टीकोनातून पद भरती करण्यात येईल.

---

**मौजे गोताळवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील गोताळवाडी ते जिल्हा परिषद मराठी शाळा ग्रामदेवता मंदीरापर्यंतच्या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१२) १८३८० (१४-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोताळवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील गोताळवाडी ते जिल्हा परिषद मराठी शाळ ग्रामदेवता मंदीरापर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून गत १० वर्षापासून सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणी स्थानिक नागरिकांनी दिनांक २५ मे, २०१५ रोजी मा.पालकमंत्री यांना लेखी निवेदन देवून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर रस्त्यात्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१) व (२) होय.
(३) प्रश्नांकित रस्त्याची जिल्हा परिषद रत्नागिरी मार्फत पहाणी करण्यात आली आहे.
(४) व (५) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलबध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रमीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्याची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३७३३.८२ लक्ष तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु.७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु. १७००.६३ लक्ष असा एकूण रु.६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीत तीन रस्त्यांचा समावेश आहे. १) करंबेळे गावची गोताडवाडी खंडागळेवाडी ते कनकाडी येरडेवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२११, २) मेघी कनकाडी वांझोळे बावनदी कासार कोळवण कोंड्ये निवधे कळकदरा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.९२, ३) करंबळे गावची धावडेवाडी झोरेवाडी मिरगळवाडी ते इजिमा ९२ रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२१२

उपरोक्त रस्त्यांवर एस.टी.वाहतुक सरु असून सदर रस्त्यांच्या खराब लांबीतील रस्ते दुरुस्तीची कामे अर्थसंकल्पात/रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमातून उपलब्ध निधी व निकषाचा अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचे प्रयत्न राहतील.

---

## पुणे जिल्हा परिषदेच्या मुकादमवाडी वाल्हे (ता.पुरंदर) येथील प्राथमिक शाळेमध्ये एका शिक्षकाने आपल्या जागी पोटशिक्षिकेची केलेली नेमणूक

**(१३) १८७३१ (१०-०८-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेच्या मुकादमवाडी वाल्हे (ता.पुरंदर) येथील प्राथमिक शाळेमध्ये श्री.संदिप जगताप या शिक्षकाने शाळेत आपल्या जागी पोटशिक्षिका नेमून स्वत: मात्र राजकारण, सभा, बैठका व जमिन खरेदी-विक्री करीत असल्याची बाब वाल्हे केंद्र प्रमुखांना शाळेची तपासणी केली असता निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुसार या प्रकरणी संबंधित दोषींविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१) होय.

(२) मुकादमवाडी, वाल्हे, ता.पुरंदर येथील उपशिक्षक श्री.संदीप जगताप हे शाळेत गैरहजर रहात असून मुलांना शिकविण्यासाठी अन्य शिक्षिकेची त्या शाळेत नियुक्ती केल्याची केंद्रप्रमुख वाल्हे यांनी सदर शाळेस भेट दिली असता दिसून आले.

गटशिक्षणाधिकारी, पुरंदर याचे मार्फत प्राथमिक चौकशी करुन शालेय कामकाजात हलगर्जीपणा व असमाधनकारक कामकाजाबाबत दिनांक २०.०४.२०१५ रोजी श्री. जगताप यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम ३(१) मधील तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिनांक २९.०४.२०१५ च्या आदेशान्वये श्री.जगताप यांना निलंबित केले आहे तसेच त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माडप येथील (ता.महाड) प्राथमिक शाळेतील ईश्वर कांबळे या शिक्षकाने शाळेतील लहान मुलींशी गैरवर्तन केल्याबाबत

**(१४) १८९४८ (१४-०८-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेच्या माडप येथील (ता.महाड) प्राथमिक शाळेतील ईश्वर कांबळे या शिक्षकांविरुध्द शाळेतील लहान व कोवळ्या मुलींशी लैंगिक चाळे करीत असल्याबाबतचा गुन्हा लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये पोलिसांत गुन्हा एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात दाखल करण्यांत आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लैंगिक शोषण झालेल्या मुलींच्या पालकांनी व स्थानिक जागरुक महिलांनी या विकृत शिक्षकांवर कारवाई करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शिक्षकांची त्या शाळेवरुन बदली करणेत आली परंतु त्यांचेवर गुन्हा दाखल करुन त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच या प्रकरणी चौकशी करुन श्री.कांबळे यांना अटक करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, गुन्हा दाखल करुन त्यांना निलंबित करण्याबाबत कार्यवाही न करणाऱ्या संबंधितावर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) नाही. श्री.ईश्वर नागुराव कांबळे, प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा महड ता.खालापूर यांनी शाळेमध्ये विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याप्रकरणी त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांचे दिनांक २५-३-२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे व

श्री. कांबळे यांचेविरुध्द पोलिस स्टेशन, खालापूर, जि.रायगड येथे गुन्हा रजि.नं. ५३/२०१५ भादवि ३५४ लैंगिक अपराधापासून बालसंरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ७ आर.डब्लु ८, ९ (सी)(एल)(एम) आर. डब्लु १० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
(४) होय, श्री.कांबळे यांना दिनांक १९/५/२०१५ रोजी अटक करण्यात आली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग येथील सासोली ग्रामपंचायतमार्फत सासोली मुख्य रस्ता ते वाघमळा रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१५) १९४९४ (१७-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग येथील सासोली ग्रामपंचायतमार्फत सासोली मुख्य रस्ता ते वाघमळा रस्ता खडीकरण डांबरीकरण व दुरुस्ती यासाठी मंजूरी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांचे कुठल्याही प्रकारचे काम प्रत्यक्ष जागेवर झाले नसतांना बनावट मुल्यांकन करुन त्यातील लाखो रुपये रक्कम उचल करण्यात आल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-१२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी चौकशी केलेली असून त्यांनी दिलेल्या अहवालनुसार सदर काम प्रत्यक्ष होऊन पूर्ण झालेले आहे, परंतु सदरचे काम हे जिल्हास्तरावरुन कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी करण्यात आल्यामुळे कामामध्ये प्रशासकीय अनियमितता झाल्याचे दिसून येते.
(४) याबाबत तत्कालीन शाखा अभियंता, तसेच तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांचा अंतिम खुलासा मागविण्यात आले आहे. अंतिम खुलासा प्राप्त होताच संबंधितांवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इसवली सुतारवाडी - रेवटेवाडी ति. नवलादेवी मंदिर (ता.लांजा, जि.रत्नागिरी) परिसराच्या विकासाबाबत**

**(१६) १९६१७ (१४-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसवली सुतारवाडी - रेवटेवाडी ति. नवलादेवी मंदिर (ता.लांजा, जि.रत्नागिरी) रसता गटारासह खडीकरण व डांबरीकरण तसेच विकास कामे करणेबाबत दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी स्थानिक ग्रुप ग्रामपंचायत इसवली - पनोरे ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री तसेच ग्रामविकास मंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) तसेच सदर रस्त्याकरिता तात्काळ निधी उपलबध करुन रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१२-२०१५) :** (१) सदर निवेदन या विभागाकडे प्राप्त नाही.

(२) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याची पहाणी करण्यात आली असून प्रश्नांकित रस्त्याच्या खराब लांबीची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे आढळून आले.

(३) सन २००१-२०१२ रस्ते विकास योजनेनुसार प्रश्नांकित रस्त्याचे नाव इसवली सुतारवाडी प्राथमिक शाळा ते रेवटेवाडी प्रजिमा ६३ ला जोडणा रस्ता असून सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.११२ दर्जाचा आहे. रस्त्याची एकूण लांबी ३.५०० कि.मी. असून सदर रस्त्याच्या ०.६०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम एप्रिल २०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत या रस्त्याचे खडीकरण करण्याचे रु. १.०० लक्षचे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या उर्वरीत खराब लांबीतील दुरुस्तीचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पलढग धरणावरील एक्सप्रेस कॅनोलच्या कामासाठी निधी देण्याबाबत**

**(१७) २१०९३ (१४-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पलढग (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील धरणातील ओवर फ्लो होणारे पाणी नळगंगा, (ता.मोताळा) येथील धरणात सोडण्याबाबतचा एक्सप्रेस कॅनॉलचा सर्वे जलसंधारण विभागामार्फत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त एक्सप्रेस कॅनॉलचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे काय,

(३) सदर एक्सप्रेस कॅनॉलचे कामासाठी आवश्यक निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) नाही.

पलढग (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील धरणातील अतिरिक्त सेवा नळगंगा, ता.(मोताळा) येथिल धरणात सोडण्याबाबतचा एक्सप्रेस कॅनॉलचा सर्वे जलसंधारण विभागामार्फत करण्यात येत नसुन जलसंपदा विभागांतर्गत बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा या विभागामार्फत करण्यात येत आहे.

(२) नाही, सदरचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरडवाहू शेतीसाठी कृषी विकास योजना व महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना राबविण्याबाबत**

**(१८) २१५१७ (१७-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरडवाहू शेतीसाठी संरक्षित सिंचनाचा सक्षम पर्याय म्हणून शासनाने कृषी विकास योजना व महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत काम करणाऱ्या मजुरांवर मोठ्या प्रमाणावर बंधने लादण्यात आली असून त्याला १ मीटर कामासाठी फक्त १८१ रु. दिले जातात मात्र बाहेर त्याला २९० ते ३०० रु. रोजी मिळत असल्याने ते काम करण्यास तयार होत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, परिणामी भंडारा जिल्ह्यातील शेततळ्यांची कामे प्रलंबित असल्यामुळे सदर योजनेत काम करणाऱ्या मजुरांवरील बधने कमी करुन त्यांची मंजूरी वाढविण्यासंबंधित शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१६) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) भंडारा जिल्ह्यात शेततळयाची कामे प्रलंबित नाहीत. नरेगा अंतर्गत मजूरीचे दर केंद्र शासनाकडून निश्चित केले जातात व त्याच दरानुसार मजुरांना मजुरी देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकंणगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील रुई येथील शाहूकालिन बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१९) २१९६८ (१४-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकंणगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील रुई येथील शाहूकालिन बंधाऱ्याचे संरक्षण कठडे, संरक्षण भिंती व पिलर मोडकळीस आल्याने तेथील नागरिकांनी पाटबंधारे खात्याकडे वारंवार तीव्र आंदोलन केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंधा-याची पाहणी शासनाने केली आहे काय या पाहणीनुसार या बंधा-याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदरची दुरुस्तीचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :** (१) रुई को.प. पध्दतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. परंतु तेथील नागरीकांनी आंदोलन कलेले नाही.
(२) सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने त्याची पाहणी क्षेत्रिय अधिकारी यांचेकडून माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये करण्यात आली असून दुरुस्तीसाठीचे रु. ३.७२ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक विभागीय स्तरावर मंजूर करण्यात आले आहे. सन २०१५-२०१६ च्या प्रापणसूचीमध्ये सदर दुरुस्तीच्या कामाचा अंर्तभाव करुन सदरचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध निधीनुसार दुरुस्तीचे कामे करण्याचे नियोजीत आहे.

---

**मौ. बारव्हा, ग्रामपंचायत, (ता.लाखांदूर, जि.भंडारा) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२०) २२१०४ (१७-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. बारव्हा, ग्रामपंचायत, (ता.लाखांदूर, जि.भंडारा) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या अनेक कामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामामध्ये तलावाचे खोलकरण करण्याकरिता २० ट्रक्टर कामावर होते तर ज्या सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यात आले असे दाखविले त्या रस्त्याचे बांधकाम करण्यात आलेले नसणे, तर काही रस्त्यावर प्रस्ताव व निविदा न काढता मुरुम टाकण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर, मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा, खंडविकास अधिकारी पंचायत समिती लाखांदूर यांना अनेक वेळा निवेदने देऊनही अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामामध्ये गैरव्यवहार करणा-या सरपंच, उप सरपंच, ग्रामसेवक, पंचायती सदस्यांच्या कामाची चौकशी करुन दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०१-२०१६) :** (१) नाही. तथापि, झालेल्या कामांमध्ये काही प्रमाणात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) तलावाचे खोलीकरण कामामध्ये गाळ वाहतूक करण्याकरिता २० ट्रॅक्टर कामावर होते हे खरे आहे. तथापि, बांधकाम करण्यात आलेले नाही व रस्त्याच्या कामाचे निविदा काढले नाही, हे खरे नाही.

(३) नाही.

(४) सदर प्रकरणी गैरव्यवहार झालेला नसून काही प्रमाणात अनियमितता झालेली आहे. अनियमिततेस जबाबदार असलेल्या ग्रामपंचायत सचिव व तांत्रिक अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पालघर जिल्हा स्थापन होऊन अद्यापही रोस्टर अभावी पदे रिक्त असल्याबाबत

**(२१) २२७७१ (१७-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा स्थापन होऊन अद्यापही रोस्टर अभावी शेकडो पदे न भरता रिक्त राहणार असून त्यामुळे प्रशासनाची कार्यक्षमता कमी होऊन जनतेच्या कामांना न्याय मिळणार नाही अशी तांत्रिक अडचण उद्‌भवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही तांत्रिक अडचण दुर करण्यासाठी रोस्टर वेगळे करण्याची आवश्यकता असुन तसेच विकल्पामुळे पालघर मधील बहुतांश कर्मचारी वर्ग ठाणे जि.प. मध्ये वर्ग होणार आहेत त्यात शिक्षकांचे प्रमाण खुप मोठ्या प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(३) जिल्हा परिषद पालघरच्या प्रशासकीय कामाच्या सोयीच्या दृष्टीने व जनतेस कोणताही त्रास होणार नाही यासाठी जिल्हा परिषद, पालघर मधील प्रलंबित कर्मचारी भरती सुरु करण्याबाबत नविन आकृतीबंध व उचित कार्यपध्दती अनुसरण्यास कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली असून या दोन्ही जिल्ह्यातील जिल्हास्तरावरील गट-क व गट-ड पद भरती करण्याच्या अनुषंगाने, दोन्ही जिल्ह्यांची नवीनतम लोकसंख्या (अनुसुचित जाती व जमाती) विचारात घेऊन आरक्षण निश्चितीची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाद्वारे प्रगतीपथावर आहे. या दोन्ही जिल्ह्यांचे आरक्षण निश्चित झाल्यानंतर जुन्या एकत्रित ठाणे जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांच्या विकल्पानुसार विभाजीत ठाणे जिल्ह्यात उपलब्ध्तेनुसार टप्प्याने समायोजन करण्यात येईल व अशी प्रक्रीया करतांना नवनिर्मीत पालघर जिल्ह्यासाठी पदे रिक्त राहणार नाहीत या दृष्टीकोनातून पद भरती करण्यात येईल.

---

### मे. अब्दुल लेबर सप्लायर्स ह्या फर्मने सर्व्हीस टॅक्सबाबत केलेली फसवनूक

**(२२) २२७८७ (११-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील मे. अब्दुल लेबर सप्लायर्स ह्या फर्मने शहरातील विविध संस्था, संघटना व कंपनीला कर्मचारी पुरविण्याचा व्यवसाय करुनही त्या प्रित्यर्थ भरावयाच्या सर्व्हीस टॅक्स बाबत शासनाची ७० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे प्रकरण माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०१-२०१६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सहाय्यक आयुक्त, उत्पादन शुल्क, सीमा शुल्क तथा सेवाकर आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार मे.अब्दुल सप्लायर्स यांनी सेवा कराची रु. ४५,१२,८३५/- फसवणूक केल्याचे लक्षात आल्याचे कळविले आहे.

(२) सहाय्यक आयुक्त, उत्पादक शुल्क, सीमा शुल्क तथा सेवाकर आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार, तक्रार (FIR) दाखल करण्यात आली. मा. उच्च न्यायालय, सदर (FIR) औरंगाबाद यांनी आरोपपत्र दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

(३) लागू नाही.

---

### पंचायत समिती रामटेक (जि.नागपूर) अंतर्गत असलेल्या नगरधन ग्रामपंचायतमध्ये रोजगार हमी योजनेतंर्गत कामात झालेला गैरव्यवहार

**(२३) २२८३० (१४-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व पंचायत समिती रामटेक (जि.नागपूर) अंतर्गत असलेल्या नगरधन ग्रामपंचायत नगरधन येथे रोजगार हमी योजनातंर्गत मनोरेगा योजनेत मृत व्यक्तीचे जॉब कार्ड तयार करण्यात आले असून कामावर नसलेल्या लोकांचे नावाने पगार काढणे,मजूरांकडून कमिशन मागणे,कामात अनेक महिला मजुरांच्या मजूरीमध्ये अफरातफर करणे, बिहार पटर्न अंतर्गत लावलेल्या झाडांबाबत खोटी माहिती देवून यामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत ग्रामपंचायत सदस्यांनी तहसिल कार्यालयासमोर ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान बेमुदत उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास,त्यानुषंगाने संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०१-२०१६) :** (१) प्रस्तुत प्रकरणी दोन ग्रामपंचायत सदस्यांकडून दिनांक ११/३/२०१५ रोजी तक्रार प्राप्त झाली होती.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती रामटेक यांनी दिनांक १३/३/२०१५ नुसार, विस्तार अधिकारी (पंचा), सहायक कार्यक्रम अधिकारी (रोहयो) व तांत्रिक कृषि सहायक (रोहयो) पंचायत समिती, रामटेक यांना चौकशी करण्याबाबत आदेश दिले.

सदर तक्रार अर्जा मधील नमूद आरोप सिध्द होत नसल्याचे चौकशीअंती स्पष्ट झाले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामिण रोजगार हमी (मनरेगा) योजने अंतर्गत परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ तालुक्यातील विहिर फेरभरणाबाबत**

**(२४) २२८४० (१४-०८-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामिण रोजगार हमी (मनरेगा) योजने अंतर्गत परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ तालुक्यातील विहिर फेरभरणाचे ठरवून दिलेले उद्दिष्ट पुर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू काम किती प्रमाणात पुर्ण झाले,
(३) तसेच काम पुर्ण होण्याच्या दिरंगाईबाबत दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१२-२०१५) :** (१) व (२) ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ तालुक्यासाठी विहिर पुनर्भरणाचे उद्दीष्ट ठरविण्यात आलेले नाही. तथापि या योजनेंतर्गत परभणी, पाथरी, सोनपेठ व मानवत या तालुक्यामध्ये विहीर पुनर्भरणाची ३८३ कामे पूर्ण करण्यात आली आहेत त्याची तालुकानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| पं.स. | पुर्ण कामे |
|---|---|
| परभणी | १११ |
| पाथरी | ५९ |
| मानवत | १४६ |
| सोनपेठ | ६७ |
| **एकूण** | **३८३** |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परभणी तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे मनरेगा अंतर्गत मजुरांना काम देण्याबाबत

**(२५) २२८८० (१४-०८-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शासनाने मनरेगा अंतर्गत ६४५९६ मजुरांना काम देण्यासाठी विविध कामे सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच यापैकी फक्त २४ हजार ६७ मजुरांनाचा कामे देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतरांना कामे न देण्याची कारणे काय आहेत व त्यांना कामे केव्हा देण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

परभणी तालुक्यामध्ये ज्या मजूरांनी कामाची मागणी केली त्यांना काम उपलब्ध करुन देण्यात आले आहे. कोणत्याही मजुरांना कामे नाकारलेली नाहीत. तसेच पुढील कामांच्या मागणीसाठी ग्रामपंचायतनिहास शेल्फवर कामे उपलब्ध केली आहेत.

परभणी तालुक्यामध्ये ६५,५११ नोंदणीकृत मजूर आहेत. यापैकी सन २०१५-१६ मध्ये ३८३३ मजुरांनी कामाची मागणी केली. त्यापैकी ३७४७ मजुरांना काय उपलब्ध करुन दिले. प्रत्यक्ष २६२५ मजुरांनी काम केले. त्यातून ८२,५४२ मनुष्यदिनांची निर्मिती झाली. सध्या ७४५ कामे प्रगतीपथावर आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्यात सिंचन विहिर योजना अभियान संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(२६) २३३३५ (०७-०४-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात धडक सिंचन विहिरीच्या ६९२ मंजुर विहिरीपैंकी केवळ १२१ विहिरींची कामे झाल्यामुळे अमरावती जिल्ह्यात सिंचन विहिर योजना अभियान संथ गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०१-२०१६) :** (१) नाही अमरावती ज़िल्ह्यात धडक सिंचन विहिर योजने अंतर्गत ६८२ कामे मंजूर असून त्यापैकी आतापर्यंत ३५१ विहिरींची कामे पूर्ण झालेली आहेत. ११९ कामे प्रगतीपथावर आहेत. २१२ विहिरींची कामे लाभार्थ्यांनी विविध कारणास्त्व सुरु केलेली नाहीत. अपूर्ण विहिरींची कामे करण्यासाठी ३०/६/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर कामे पावसाळ्यानंतर हाती घेऊन पूर्ण करण्याची कार्यवाही तालुकास्तरीय यंत्रणेकडून करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बदनापूर (जि.जालना) येथील दाभाडी येथे मनरेगाच्या कामांसाठी मजूरांची मागणी असतांनाही कामे ट्रॅक्टरने सुरु असल्याबाबत**

**(२७) २३८१३ (१४-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापूर (जि.जालना) येथील दाभाडी येथे मनरेगाच्या कामांसाठी मजूरांची मागणी असतांनाही ही कामे ट्रॅक्टरने सुरु झाल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य शेतमजुर युनियन (लाल बावटा) च्या वतीने राजूर-औरंगाबाद मार्गावर रास्ता रोको आंदोलन माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१६) :** (१) रस्ता रोको आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे.

(२) मौजे दाभाडी येथील कंपार्टमेंट बंडीगच्या कामांना जिल्हा नियोजन व विकास मंडळ जालना यांचे मंजूरी ओदश क्र. ४३५, दि. ९.३.२०१५ अन्वये एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम योजने अंतर्गत मशिनद्वारे कामे मंजूर असल्याने त्यानुसार व मार्गदर्शक सूचनांनूसार जी कामे मशिनद्वारे करणे अपेक्षित होते, ती कामे मशिनद्वारे केली आहेत.

मौजे दाभाडी ता.बदनापूर येथील मजूरांच्या मागणीप्रमाणे तत्काळ कामांचे नियोजन करुन म.ग्रा. रो.ह.यो अंतर्गत कृषी विभागामार्फत कामे सुरु करण्यात आली. त्यामध्ये कंपार्टमेट बंडींगची कामे सुरु करण्यात येवून मंजूरांना कामे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. मौजे दाभाडी येथे २०७७ इतके मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली असून मजूरांना त्यांची मजूरी अदा करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या हजारो मजुरांना कामे देण्याबाबत

**(२८) २३८१४ (१४-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफराबाद (जि.जालना) तालुक्यात येथे गेल्या दोन महिन्यांपासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या हजारो मजुरांनी दुष्काळात कामे द्या अशी मागणी करुनही कामे सुरु होत नसल्यामुळे व अधिका-यांच्या उदासिन धोरणामुळे मजूरांवर उपासमारी व स्थलांतर करण्याची वेळ आली आहे तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा.मुख्यमंत्रीमहोदयांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मजूरांना कामे नसल्यामुळे सुमारे ४५० मजूरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार मजूरांना तात्काळ काम उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदर प्रकरणी दोषी व्यक्तीवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१६) :** (१), (२), (३) व (४) म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत जालना जिल्ह्यात मंजूर कामे चालू न केल्याबद्दल संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची मागणी श्री. संतोष पाटील दानवे, विधानसभांना सदस्य यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ५.४.२०१५ च्या पत्रान्वये केली आहे.

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत १३० कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी सध्या २६ कामे सुरु आहेत. सबब, कामे सुरु होत नसल्यामुळे मजूरीवर उपासमारी व स्थलांतर करण्याची वेळ आली आहे, हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत वैयक्तिक सिंचन विहिरींची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२९) २३८१६ (१७-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत वैयक्तिक सिंचन विहिरींची अपूर्ण असलेली कामे येत्या जून, महिन्याअखेरपर्यंत पूर्ण करावेत, असे स्पष्ट आदेश राज्य

शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागातर्फे राज्यातील सर्व जिल्हा परिषद कार्यालयांना बजावण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना जिल्ह्यासह राज्यभरातील अनेक जिल्ह्यात किती वैयक्तिक सिंचन विहिरींच्या मंजूरीचा आकडा किती आहे,

(३) तसेच एकटया जालना जिल्ह्यात साडेनऊ हजार विहिरींपैकी तब्बल साडेपाच हजार विहिरींची कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

तथापि, राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत जवाहर/धडक सिंचन विहिर योजनेतील इतर लाभार्थ्यांच्या अपूर्ण असलेल्या विहिरी दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना रोजगार हमी योजन विभागाकडून देण्यात आलेल्या होत्या. ही मुदत आता शासन निर्णय दिनांक २९ जुलै, २०१५ अन्वये दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

(२) महात्मा गांधी नरेगा योजनेअंतग आजमितीस एकूण १,७०,६२२ इतक्या विहिरींना मंजूरी देण्यात आलेली आहे. यापैकी जालना जिल्ह्यात १२,७४१ इतक्या विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

(३) जालना जिल्ह्यात एकूण मंजूर विहिरीपैकी ११,०२७ सिंचन विहिरींची कामे हाती घेण्यात आली असून एकूण ४,४२५ इतक्या विहिरी पूर्ण झाल्या आहेत व ६,६०७ विहिरींचे कामे अपूर्ण आहेत.

(४) व (५) अपूर्ण विहीरी पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु असून त्यावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत - अ) क्षेत्रीय स्तरावर उद्भवणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासन परिपत्रक दिनांक ७ मार्च, २०१५ अन्वये पुढीलप्रमाणे अतिरिक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१) जादा कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे.

२) ग्रामपंचायतीस /इतर यंत्रणेस प्राधान्याने अग्रीम उपलब्ध करुन देणे.

३) पात्रतेचे निकष शिथिल करुन देणे.

ब) वेळोवेळी मंत्रालयीन स्तरावर, विभागीय स्तरावर विविध बैठका, क्षेत्रीय भेटी आयोजित करण्यात आलेल्या आहे.

क) शासन पत्र दिनांक २६ मे, २०१५ अन्वये सिंचन विहिरींच्या साहित्यावरील खर्चासाठी प्रत्येक जिल्ह्यांना कुशल खर्चाचे उद्दिष्ट देण्यत आलेले होते.

ड) तसेच शासन परिपत्रक दिनांक २० मे, २०१५ अन्वये सन २०१५-१६ च्या लेबर बजेटमध्ये सिंचन विहिरींसाठी २०% निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कामशेत (ता.मावळ, जि.पुणे) येथील इंद्रायणी नदीच्या पात्रातील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत**

**(३०) २४२४९ (१४-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा - मावळ तालुक्यातील कामशेत येथे शेतक-यांना शेती व पिण्यासाठी मुबलक पाणी मिळावे, म्हणून शासनाने इंद्रायणी पात्रात २० वर्षापुर्वी १० लाख रुपये खर्च करुन कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधला आहे, हे खरे आहे काय,

(२) असलयास, या बंधा-यांच्या भिंती पडल्या असून लोखंडी प्लेट पाण्यात पडल्या आहेत त्यामुळे पाण्याची गळती मोठ्या प्रमाणत होत असून आगामी काळात २५ गावातील पाणीयोजना बंद पडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वडीवळे धरणातुन पाणी सोडल्यानंतर या बंधा-यात पाणी राहत नसुन पुर्ण पाणी वाहुन जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वडीवळे पाटबंधारे विभागाच्या वतीने २०१४-१५ अंतर्गत या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी खर्च रु.७० लक्ष रुपयाचा प्रस्ताव सादर केला आहे काय असल्यास, बंधा-याची तातडीने दुरुस्ती होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :** (१) होय,

(२) अंशत: खरे आहे.

बंधारा नादुरुस्त झालेला आहे. परंतु या बंधाऱ्यावर अवलंबुन असलेल्या पाणी योजनासाठी व शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

इंद्रायणी नदीवर को.प. बंधाऱ्याची श्रृंखला बांधण्यात आली असल्यामुळे या बंधात्यातून पाणी वाहुन जात असले, तरी ते निम्न बाजुच्या बंधाऱ्याद्वारे वापरण्यात येत आहे.

(४) होय,

नाने-नाणोली को.प. बंधाऱ्याच्या विशेष दुरस्तीचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी मध्यम प्रकल्प, राई, ता.राधानगरी या प्रकल्पास कृष्णा खोरे विकास मंडळाने दिलेल्या मान्यतेबाबत**

**(३१) २४२८७ (१४-०८-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी मध्यम प्रकल्प, राई, ता.राधानगरी या प्रकल्पास कृष्णा खोरे विकास मंडळाने रुपये १२०.३० कोटी रक्कमेस दिनांक २४ डिसेंबर, १९९६ रोजी मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी मध्यम प्रकल्प, राई, ता.राधानगरी या धरणास दिनांक ९ फेब्रुवारी, २००५ रोजी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेऊन धरणाची संख्या ६५० मी. ने खाली सरकवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन वहन अंतर प्रस्ताव मुख्य अभियंता यांनी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याप्रमाणे ठेकेदारांना देयके अदा केली आहेत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, पूर्वीच्या वहन अंतरानुसार ठेकेदाराला जादा रक्कम अदा करण्यात आल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-१२-२०१५) :** (१) होय.
(२) मूळ मंजूर संरेखेच्या पायामध्ये वनजमिन येत असल्याने तसेच, प्रकल्पामुळे बाधित होणारे नियत वनक्षेत्र व वन्यजीव क्षेत्र कमी करण्याच्या दृष्टीने, धरणाची संरेखा ६५० मी. ने खाली सरकवून माहे ११/२००० मध्ये धरणाचे काम सुरु करण्यात आले व सदर बदललेल्या संरखेस महामंडळाने २००२ मध्ये कार्यात्तर मान्यता दिली. त्यास अनुसरुन सादर केलेल्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालास महामंडळाने दि. ९ फेब्रुवारी, २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.
(३) निविदा शर्त-३८ च्या प्रस्तावास मान्यता देताना वहन अंतरास मान्यता दिली आहे.
(४) खोदकाम, संधानक व लोहसळी या बाबींचे परिणाम १२५ टक्क्यापेक्षा जास्त झाल्यामुळे सदर बाबींची देयके निविदा शर्त ३८ प्रमाणे अदा करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील शेणवडे ते अणदूर दरम्यान कुंभी नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याची दुरुस्ती करणेबाबत**

**(३२) २४३११ (१४-०८-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील शेणवडे ते अणदूर दरम्यान कुंभी नदीवरील कोल्हापूर पध्दतीचा बंधा-याचा स्लॅब पिलरसह माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अणदूर परिसरातील नगरिकांना गगनबावडा व कोल्हापूर येथे जाणेकरीता कुंभी नदीवर नागरिकांनी लाकडी साकव बांधला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळ्यापुर्वी सदर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा दुरुस्त करणेची मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) कुंभी नदीवरील शेणवडे येथील को.प. बंधाऱ्यांच्या दुरुस्तीकरीता नियमीत देखभाल व दुरुस्ती अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतुन रु. ७.०५ लक्ष किंमतीच्या अत्यावश्यक दुरुस्तीच्या कामाची निविदा निश्चित करण्यात आली आहे. यावर्षीच्या पावसाळ्या नंतर ही दुरुस्तीची कामे करण्याचे नियोजीत आहे.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे दसरखेड ते चिंचोल व मौजे निंबोळी जोडरस्ता या रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(३३) २५४२९ (१७-०९-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे दसरखेड ते चिंचोल व मौजे निंबोळी जोडरस्ता या रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे या रस्त्यावरुन दुचाकी, चारचाकी वाहनधारकांना व सर्व सामान्य नागरीकांनी गैरसोय होत असल्याची बाब माहे जून, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली असुन या रस्त्याच्या खडीकरण कामासाठी प्रत्येकी रु. २० लक्ष निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे खडीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद,बांधकाम विभाग, बुलढाणा यांना सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१२-२०१५) :** (१) व (२) प्रश्नांकित रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर रस्त्यावर वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(३) बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बुलडाणाकडे अशा प्रकारचे निवेदन आढळून येत नाही.

(४) मलाकपूर तालुक्यातील मौजे निंबोळी जोडरस्ता हा सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र. २४ चा भा रस्त असून या भाग रस्त्याची लांबी १.२० कि.मी. आहे सदर रस्त्याचा पृष्ठभाग खडीचा आहे. या रस्त्याच्या खडीनुतनीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनेमधून प्राप्त निधी व निकष यांच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच मौजे दसरखेड ते चिंचोल हा योजनाबाहय रस्ता असून सन २०१५-१६ या वर्षात १३ वा वित्त आयोग जिल्हा स्तर अंतर्गत सदर रस्त्याचे मुरमीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे हल्लारवाडी, आसगाव, कामेवाडी, माणगाव, तुर्केवाडी, जंगमहट्टी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याची झालेली दुरवस्था**

**(३४) २५५४७ (१७-०९-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील मौजे हल्लारवाडी, आसगाव, कामेवाडी, माणगाव, तुर्केवाडी, जंगमहट्टी या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याची दुरवस्था झाल्याची माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) सदर बंधा-याची दुरुस्ती करणेबाबत मा.जलसंपदा मंत्री यांना चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी दि.१५/६/२०१५ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर बंधा-याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर यांच्या सन २०१३-१४ च्या पाहणी मध्ये बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची बाब निदर्शनास आली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर बंधाऱ्यांची पाहणी करण्यात आली आहे. त्यानुसार आसगांव व तुर्केवाडी या बंधाऱ्यांना सद्यस्थितीत दुरुस्तीची आवश्यकता नाही. मात्र कामेवाडी व माणगांव या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने सन २०१३-१४ च्या प्रापणसूचीत समाविष्ट करण्यात आली होती. तथापि, निधीअभावी कामे हाती घेता आली नाहीत.

निधीच्या उपलब्धतेनुसार सन २०१५-१६ मध्ये कामेवाडी, माणगांव, हल्लारवाडी व जंगमहट्टी या बंधाऱ्यांची दुरुस्ती कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निम्न तेरणा प्रकल्प, माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा उजवा कालव्यावरील पेठसांगवी, एकोंडी व कवठा येथे पुल बांधण्याबाबत**

**(३५) २६१४३ (१७-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न तेरणा प्रकल्प, माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा उजवा कालव्यावरील पेठसांगवी, एकोंडी व कवठा येथे अनुक्रमे कि.मी.१८, २२ व २५ या अंतरावर आवश्यक तेथे पुल बांधणेबाबत उमरगा- लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी

अभियंता, निम्न तेरणा कालवा विभाग क्र.२, लातूर यांना दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधिताद्वारे कोणतीच कार्यवाही न झालेल्या कारणाने परिसरातील नागरिकांना विविध गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निम्न तेरणा उजव्या कालव्यावरील पूल सा.क्र. १८०१३ मी. व सा.क्र. २४३९८ मी. चा समावेश निम्न तेरणा प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात असून महामंडळाच्या दि. १२/०९/२००८ च्या पत्रान्वये मान्यता प्राप्त आहे.

तसेच सा.क्र. २२२७० मी. पुलाच्या बांधकामास कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने दि. २१/०८/२००८ च्या पत्रान्वये मान्यता कळविली आहे. सदर पुलास समावेश निम्न तेरणा प्रकल्पाच्या प्रस्तावित चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावात करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कासारसाई कुसगाव (ता.मावळ) येथील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३६) २६२६९ (१७-०९-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासारसाई कुसगाव (ता.मावळ) येथील रस्त्याच्या दुरवस्थेमुळे कासारसाई धरणाच्या भिंतीवरुन सार्वजनिक वाहतूक चालू असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता खाडी, माती मुरूम यापासून बनविलेला असतानाही या रस्त्यावरुन अवजड वाहने धोकादायक वाहतूक करत असल्याने रस्त्याचा भराव खचल्यास मोठ्या प्रमाणावर धरणाला धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त धोकादायक वाहतूक थांबविण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :** (१) होय.

धरणाच्या खालील बाजूचा रस्ता पावसाळ्यात खराब झाल्याने जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून जून, २०१५ मध्ये अल्प कालावधीसाठी वाहतूक धरण माथ्यावरुन सुरु करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

कासारसाई-कुसंगाव रस्ता धरणाच्या निम्न बाजूने बांधण्यात आला असून या रस्त्यावरील वाहतुकीमुळे धरणास धोका निर्माण होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावरगाव फॉरेस्ट ते वाटोद फाटा (ता.मनोरा, जि.वाशिम) येथील रस्ता अपूर्णवस्थेत असल्याबाबत**

**(३७) २६५५० (१७-०८-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगाव फॉरेस्ट ते वाटोद फाटा (ता.मनोरा, जि.वाशिम) येथील हा रस्ता सन २००४ मध्ये रोजगार हमी योजना अंतर्गत मंजूर झाला असून अद्यापपर्यंतही रस्ता पूर्ण झाला नसल्यामुळे या भागातील नागरिकांनी दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासमारास बेमुदत उपोषण करुन सदर रस्ता तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१) होय.

(२) सावरगाव येथील रोहायो अंतर्गत मंजूर झालेल्या रस्त्याची एकूण लांबी ४.५० कि.मी. पैकी सुरवातीची रस्ता लांबी १.५० कि.मी.चे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित ३.०० कि.मी.चा रस्ता वन जमिनीच्या मान्यतेअभावी काम पूर्ण होऊ शकले नाही. सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्यास्तव वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत या रस्त्याच्या वन जमिनीचा वळतीकरणाचा ऑनलाईन प्रस्ताव कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जि.प.वाशिम यांचे ऑनलाईन प्रस्ताव क्र.एफ.पी./एम.एच/रस्ता/१२१५८, दि. २९.४.२०१५ अन्वये प्रधान मुख्य वनसरंक्षक, नागपूर यांचेकडे मंजूरीस्तव सादर करण्यात आला आहे. वन विभागाने प्रस्तावामध्ये काही त्रुटी उपस्थिती केल्या आहेत. त्याचे अनुपालन संबंधित जिल्हा परिषद बांधंकाम विभाग यांचेमार्फत सुरु आहे. वन जमीन वळती करण्याच्या प्रस्तावास वन खात्याची मान्यता प्राप्त होताच रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बदनापूर (जि.जालना) तालुक्यातील चितोडा येथील रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरीच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची पुर्नचौकशी करण्याबाबत**

**(३८) २६५८६ (१७-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापूर (जि.जालना) तालुक्यातील चितोडा येथील रोजगार हमी योजनेअंतर्गत २०१३-१४ मध्ये झालेल्या विहिरीच्या कामात गैरव्यवहाराची झाल्याप्रकरणी सादर केलेला चौकशी अहवाल फेटाळून पुर्नचौकशीची मागणी करुन ६ महिने उलटले तरी सदरची चौकशी सुरु झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची चौकशी अद्यापपर्यंत न करण्याची कारणे काय आहेत,

(३) या प्रकरणी पुर्नचौकशी झालेली असल्यास, त्यांचा अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, अहवालानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१६) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे चितोडा, ता.बदनापूर जि.जालना येथील ३० मंजूर सिंचन विहीरीच्या कामातील गैरव्यवहारबाबतचा चौकशी अहवाल स्थायी समितीच्या बैठकीत फेटाळण्यात आला. तद्नंतर सदर प्रकरणाची फेर चौकशी करण्यासाठी श्री.एस.एस.लोखडे, तत्कालीन गटविकास अधिकारी, भोकरदन व श्री.एस.एल.जाधव उप अभियंता, जिल्हा ग्रामविकास यंत्रणा, जालना यांची पुर्नचौकशी समिती नेमण्यात आली. तथापि, श्री.लोखंडे यांची जिल्हया बाहेर बदली झाल्याने व श्री.जाधव सेवानिवृत्त झाल्याने पुर्नचौकशी होवू शकली नाही. सद्य:स्थितीत या प्रकरणाची पुर्नचौकशी करण्यासाठी श्री.एस.डी.सुर्यवंशी, सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जालना व श्री.एस.डी.मोडवान, उप अभियंता, सिंचन उप विभाग, जालना यांना आदेशित केले आहे व पुर्नचौकशी चालू आहे.

---

**बोरगांवच्या (ता.हदगाव, जि.नांदेड) ग्रामसेवकांने गावच्या विकासासाठी आलेला निधी घरगुती व्यवहारात वापरल्याबाबत**

**(३९) २६७८६ (१७-०८-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगांव (ता.हदगाव, जि.नांदेड) ग्रामसेवकांने गावच्या विकासासाठी निधी घरगुती व्यवहारात वापरल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौशनीनुसार संबंधित ग्रामसेवकांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-१२-२०१५) :** (१) व (२) नाही, ग्रामपंचायत बोरगांव (ता. हदगाव, जि.नांदेड) या गावच्या विकासासाठी मागास क्षेत्र अनुदान निधीमधून अंगणवाडी बांधकाम, शाळेची संरक्षण भिंत, दलितवस्ती रस्ता व नाली बांधकाम तसेच पाणीपुरवठा कामासाठी अनुदान प्राप्त झाले होते. यापैकी दलीतवस्ती रस्ता व नाली बांधकाम आणि पाणी पुरवठा ही कामे पूर्ण झालेली आहेत, उर्वरित कामे करणे सुरु आहे.

ग्रामसेवक यांनी बँकेतून अनुक्रमे दिनांक ६.९.२०१४ रोजी व दिनांक २३.१.२०१५ रोजी रु. ५,००,०००/- व रु ९७,००० अनुदान काढले आहे, अशा प्रकारे एकूण रु. ५,९७,०००/- निधी काढला आहे. संबंधित ग्रामसेवकाने उचलेल्या निधीपैकी शाळेसाठी संरक्षण भिंत रु. ३,००,०००/- दलित वस्ती व नाली बांधकामासाठी रु. ७३,०००/- व अंगणवाडी बांधकामासाठी रु. २,००,०००/- असा एकूण रु. ५,७३,०००/- खर्च केल्याचे तपासणी अंती दिसून येते. संबंधित ग्रामसेवकाने गावासाठी आलेल्या निधीतील कामे एप्रिल, २०१५ मध्ये विलंबाने सुरु केली असल्याचे दिसून येते. तसेच अपूर्ण कामे पूर्ण करणे बाकी आहे. बँकेतून उचल केलेली रु. २४,०००/- रक्कम खर्चापेक्षा जास्त असून याबाबत अनियमितता झाल्याचे दिसून येते.

(३) व (४) सदर अनियमिततेस जबाबदार असल्यामुळे, जादा उचल वसूल करुन त्यावरील व्याज संबंधित ग्रामसेवकाकडून वसूल करण्याकरीता पं.स. हदगाव यांना परवानगी देण्यात आली आहे. तसेच संबंधित ग्रामसेवकाची एक वार्षिक वेतन वाढ कायमस्वरुपी रोखण्याची शास्ती करण्यात आली आहे.

---

**एका कंत्राटदाराला ४० कोटी रुपयांचा विक्रीकर परतावा केल्याबाबत**

**(४०) २८२३४ (१७-११-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्री करात अनियमितता करुन व्यापाऱ्याना व कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांचा परतावा करणाऱ्या विक्रीवर आयुक्त परतावा लेखापरिक्षण पुणे यांना निलंबित केल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका कंत्राटदाराला ४० कोटी रुपयांचा विक्रीकर परतावा केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाबत शासनाने कोणावर व कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही. विक्री करता अनियमिता करुन व्यापाऱ्याना व कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांचा परतावा करणाऱ्या विक्रीकर उपआयुक्त, परतावा लेखापरिक्षण, पुणे यांना दि. ०८.०७.२०१५ रोजीच्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी तीन व्यापाऱ्यांच्या प्रकरणांमध्ये अनियमितता करुन रु.३६,४७,८३,४३५/-एवढा परतावा देणाऱ्या विक्रीकर उपआयुक्त यांना शासनाच्या दि. ०८.०७.२०१५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले असून, अद्याप ते निलंबनाधीन आहेत. विक्रीकर उपआयुक्त (निलंबित) यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये नियम ८ खाली विभागीय चौकशी करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरु आहे. या प्रकरणामध्ये व्यापाऱ्यांकडून वसूली देखील करण्यात आली आहे.

१. मे.बी.टी.पाटील ॲन्ड सन्स रु. १८,००,५८,६६४/-

२. मे.महालक्ष्मी इन्फ्रा प्रोजेक्टस लि. रु. १४,३५,७८,१०४/-

३. मे.महालक्ष्मी बी.टी.पाटील जॉईंट व्हेंचर या प्रकरणी लेखा परिक्षण करण्यात आले असून, परिक्षणामध्ये व्यापाऱ्यास विक्रीकराची मागणी निघाली नाही.

तथापि, मे.बी.टी.पाटील ॲन्ड सन्स, बेळगाव व व्यापाऱ्याचे प्रतिनिधी यांच्याविरुध्द बनावट पत्रांच्या अनुषंगाने शाहूपूरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे FIR दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा पाटबंधारे विभागाअंतर्गत असलेल्या लघु मध्यम प्रकल्पाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४१) २९१८९ (१४-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा पाटबंधारे अंतर्गत ७४ लघु प्रकल्पांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी १४ लघु प्रकल्प हे पर्जन्यमाना शिवाय देखभाल व दुरूस्तीकडे झालेल्या दुर्लक्षामुळे कोरडे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे सदर प्रकल्पांच्या क्षेत्रात सिंचनाचा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पांच्या विशेष दुरूस्ती, खोलीकरण व रुंदीकरणाबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०३-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

बुलढाणा पाटबंधारे विभागांतर्गत ७८ लघु प्रकल्प पुर्ण झालेले असून ८ प्रकल्प बांधकामाधीन आहेत.

(२) सन २०१५-१६ मध्ये जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी प्रमाणात पाऊस झाल्यामुळे १४ प्रकल्पात अपयुक्त पाणीसाठा उपलब्ध न झाल्याने सदर प्रकल्प कोरडे पडलेले आहे. देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे सदर प्रकल्प कोरडे पडले अशी वस्तूस्थिती नाही.

(३) धरणात पाणी उपलब्ध न झाल्यामुळे सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे.

(४) नमुद १४ प्रकल्पापैकी केशव शिवणी प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. लोणवाडी प्रकल्प बांधकामाधीन आहे. उर्वरित प्रकल्पाची कामे आवश्यकतेनुसार टप्याटप्याने विशेष दुरुस्तीअंतर्गत करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) या तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याबाबत

**(४२) ३०१६७ (२२-०१-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) या तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कार्यालयातील शेकडो कर्मचाऱ्यांना मागील तीन चार महिन्यापासून वेतन मिळाले नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याने त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेकडो कर्मचाऱ्यांचे वेतन तातडीने देण्याबाबत तसेच या कर्मचाऱ्यांना वेतन देण्यास दिरंगाई करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागभीड तालुक्यातील (जि.चंद्रपूर) इंग्रजकालिन घोडाझरी तलावाच्या मुख्य नहराची दुरवस्था झाल्याबाबत

**(४३) ३५०४५ (१४-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागभीड तालुक्यातील (जि.चंद्रपूर) इंग्रजकालिन घोडाझरी तलावाच्या मुख्य नहर, ऐन हंगामाच्या वेळेत फुटल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निकृष्ट कामांची चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०३-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २.१०.२०१५ ला साखळी क्रमांक १३८५० ला मुख्य कालवा फुटून जवळपास ०.४० हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हयात इंदिरा आवास योजनेमार्फत कमी लोकांना घरकुलाचे वाटप झाल्याबाबत**

**(४४) ३६५२८ (२०-०१-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात इंदिरा आवास योजनेमार्फत घरे मिळण्यासाठी सन २०१५-२०१६ या वर्षात अत्यंत कमी लोकांना घरकुलाचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुणे जिल्हयातील सदर इंदिरा आवास लाभार्थ्यांना जागेचा प्रश्न सोडवून घरकुले देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१६)** : (१) होय.

सन २०१५-१६ मध्ये जालना जिल्हयास इंदिरा आवास योजने अंतर्गत ३,०५८ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. अनुसुचित जाती व जमाती, अल्प संख्याक प्रवर्गातील लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजनेव्यतिरिक्त रमाई आवास योजना, शबरी आवास योजना व राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. ०१ अंतर्गत घरकुलांचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे अनुसुचित जाती व जमाती, अल्प संख्याक प्रवर्गागाचे घरकुल पात्र लाभार्थी शिल्लक नसल्यामुळे सन २०१५-१६ साठी कमी घरकुलांचे वाटप झाल्याचे दिसून येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) इंदिरा आवास योजनेअंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना स्वत:ची जागा नसल्यामुळे घरकुलांचे बांधकाम करता येत नाही. आशा लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी शासनाने दिनांक ३० डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत स्वत:ची जागा नसलेल्या घरकुल पात्र लाभार्थ्याला जागा खरेदीसाठी रु.५०,०००/- प्रति लाभार्थी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात ६ टक्क्यांची वाढ देण्याबाबत**

**(४५) ३६७८४ (१४-०१-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने माहे जानेवारी आणि माहे जुलै, २०१५ पासून केंद्रीय कर्मचाऱ्यांना ६ टक्के प्रमाणे महागाई भत्यात १२ टक्क्यांची वाढ दिली असतांना राज्य शासनाने यांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना केवळ माहे जानेवारी, २०१५ ची वाढ नुकतीच माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये देण्याचे जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना माहे जुलै, २०१५ ची ६ टक्क्यांची वाढ प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच माहे जुलै, २०१५ ची ६ टक्क्यांची वाढ राज्य शासकिय कर्मचाऱ्यांना तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०२-२०१६) :** (१) होय.

दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याचा दर दिनांक १ जानेवारी, २०१५ पासून १०७% वरुन ११३% करण्यात आलेला आहे. सदर ६% वाढ दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ पासून रोखीने देण्यात आली आहे. तर दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंतच्या थकबाकीच्या रकमेच्या आहरणाचे आदेश दि. १५ जानेवारी, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) व (३) राज्य शासनाच्या मर्यादित साधनसंपत्तीचा तसेच राज्याची तत्कालीन आर्थिक स्थिती वितारात घेऊन महागाई भत्त्याबाबत त्या त्या वेळी निर्णय घेतला जातो.

---

**कृष्णा खोरे विकास महामंडळार्गत महिंद मध्यम धरण प्रकल्पाच्या भिंतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४६) ३६८४० (२२-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खोरे विकास महामंडळा अंतर्गत सातारा जिल्ह्यातील पाटणा तालुकयात महिंद गावाजवळील वांग नदीवर सुमारे १५ वर्षापुर्वी महिंद मध्यम धरण प्रकल्पाचे काम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मध्यम धरण प्रकल्पाच्या सांडव्याच्या बाजुला मोठया प्रमाणात पडझड झाल्याने सांडव्याच्या भिंतीला गळती लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांडव्याच्या भिंतीची पडझड होऊन गळती लागली असल्याचे निदर्शनास येऊनही संबंधित विभागाने त्याच्या दुरुस्तीचे काम हाती न घेतल्याने धरणाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) सांडव्याची गळती थांबविण्याकरिता विशेष दुरुस्ती अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तथापि, धरणास धोका संभवत नाही.
(४) सांडवा भिंतीचे विशेष दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अधर पुस व लोअर पुस प्रकल्पाचे पाणी अद्यापर्यंत शेतजमिनीत सोडले नसल्याबाबत**

**(४७) ३७९४८ (२२-०१-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अधर पुस व लोअर पुस प्रकल्प पुसद (जि.यवतमाळ) दोन्हीही तुडुंब भरलेले असतांना यावर्षी कमी पाऊस झाल्याने नोव्हेंबर, महीना सुरु होवूनही अद्यापर्यंत कॅनॉल साफ न केल्याने व आत्महत्याग्रस्त यवतमाळ जिल्ह्यात या वर्षी पाऊस कमी झाल्याने दोन्ही धरणातील पाणी शेतकऱ्यांना देण्याबाबत शासन स्तरावर जलसंपदा विभाग शेतीला पाणी सोडण्याबाबत तात्काळ कार्यवाही करणार आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०३-२०१६) :** (१) व (२) यवतमाळ जिल्ह्यातील पुस मोठा प्रकल्प व अधरपुस मध्यम प्रकल्पाचा रब्बी हंगामाचे सुरुवातीस १५ नोव्हेंबर रोजीचा उपलब्ध पाणी साठा अनुक्रमे ५९.१५ दलघमी (६५ टक्के) व ५६.८७ दलघमी (९५ टक्के) इतका होता. पुस मोठ्या प्रकल्पाच्या कालवा व वितरण प्रणालीची पुनर्स्थापनेची कामे महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत पुर्ण् करण्यात आलेली आहे. लाभधारकांच्या मागणीनुसार दि. १९/११/२०१५ रोजी सिंचनासाठी पाणी सोडण्यात आलेले आहे. तसेच अधर पुस मध्यम प्रकल्पावरील कालव्याच्या अत्यावश्यक लांबीतील किमान दुरुस्त्या करुन लाभधारकांच्या मागणीनुसार दि. २५/११/२०१५ रोजी सिंचनासाठीपाणी सोडण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मराठवाड्यातील साठवण तलाव, अर्धवट कॅनल पूर्ण करण्याबाबत

**(४८) ३८८०१ (२०-०१-२०१६). श्री.सुरुपसिंग नाईक (नवापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील प्रलंबित साठवण तलाव, अर्धवट कॅनल व बंद पडलेले लिप्ट इरिगेशन यामुळे मराठवाड्याला दुष्काळाचा सामना करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पुर्णत्वास नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.

मराठवाड्यामध्ये मागील काही वर्षापासून झालेला अत्यल्प व असमतोल पर्जन्यमानामुळे धरणामध्ये अत्यल्प पाणीसाठी होत आहे. त्यामुळे मराठवाड्याला दुष्काळाचा सामना करावा लागत आहे.

(२) अपुर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मा.राज्यपाल यांचे निदेशानुसार व उपलब्ध अर्थोपायानुसार प्राधान्यक्रम ठरिवण्यात येऊन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील दक्षिण सोलापूर उत्तर सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील कालव्याचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४९) ३९११७ (२०-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दक्षिण सोलापूर उत्तर सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील २२ गावांच्या हद्दीतील १५५९९ हेक्टर शेती क्षेत्र ओलीताखाली आणण्यासाठी सन २००४ साली राज्यपाल टंचाई कार्यक्रमातून देगाव शाखा कालव्याचे काम अपुरी निधी अभावीमुळे ११ वर्षा नंतरही पूर्ण होऊ शकले नसल्याच माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी आणखी ३१० कोटीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कालव्याचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी निधीची उपलब्धता करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) भिमा (उजनी) प्रकल्पांतर्गत सन २००४ मध्ये देगाव शाखा कालवा मंजूर झाला असून त्याची किंमत रक्कम रु. ९४.८० कोटी होती. कालव्यात २६ टक्के काम पूर्ण झाले आहे. राज्यपाल टंचाई कार्यक्रमातून रु. ५ कोटी निधी राज्यपाल निधी वितरित करण्याचे सुत्रानुसार उपलब्ध झाला व त्यामधून कि. मी. ५ ते २४ मधील मातीकाम अंशत: करण्यात आले.

(२) देगाव शाखा कालव्याची अद्यावत किंमत रु. ३८५.५५ कोटी असून डिसेंबर २०१५ अखेर रु १०१.४० कोटी इतका चार्च झाला आहे. सदर प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी आणखी २८४.१५ कोटी आवश्यक आहे.

(३) निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) निधीचा अनुलब्धता.

---

**कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे ७७ प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(५०) ३९२२१ (२०-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत हाती घेण्यात आलेल्या ९० पाटबंधारे प्रकल्पांपैकी ७७ प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्ण प्रकल्पांच्या पूर्तीसाठी कोट्यावधी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अपूर्ण प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) नाही.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळामार्फत आता पर्यंत ९३ पाटबंधारे प्रकल्पाची बांधकामे हाती घेण्यात आली असून त्यापैकी ३७ प्रकल्पांची कामे बहुतंशी पूर्ण करुन अर्थसंकल्पीय तरतूदीतून वगळण्यात आली आहेत. सदर प्रकल्पांची उर्वरित कामे अविशिष्ट तरतुदीतून प्रस्तावित आहेत.

(२) होय

सद्य:स्थितीत बांधकामाधिन प्रकल्पांसाठी अंदाजे रु. १६०५२.४७ कोटी निधी अंदाजित असून त्यापैकी मार्च २०१५ अखेर रु. ७१००.२८ कोटी खर्च झाला आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अंदाजे रु. ८९५२.१९ कोटी निधीची आवश्यकता आहे.

(३) अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्रशासनाच्या वेगवर्धीत सिंचन लाभ योजना नाबार्ड अंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे. मा. राज्यपाल यांचे निदेशानुसार व राज्याच्या अर्थीपायानुसार कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.